**ई-निविदा प्रणाली अंतर्गंत प्राप्त होणाऱ्या निविदा देकाराबाबत अवलंबवयाची कार्यपध्दती**

# महाराष्ट्र शासन
## ग्राम विकास विभाग
### शासन निर्णय क्रमांकः क्र.निविदा-२०१२/प्र.क्र.९७/पंरा-७

बांधकाम भवन, २५,मर्झबान पथ,फोर्ट,मुंबई-४०० ००१.
फोर्ट, मुंबई-४०० ००१.
तारीख: २३ सप्टेंबर,२०१३.

**वाचा :-**

१) शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग.क्र.सीएटी-१०/२००६/प्र.क्र.१३३/इमारती-२, दिनांक २ नोव्हेंबर,२००६
२) शासन निर्णय, ग्राम विकास व जल संधारण विभाग क्र.झेडपीए-२००५/प्र.क्र.३७५/वित्त९, दिनांक ३० डिसेंबर, २००६
३) शासन परिपत्रक, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,क्र.झेडपीए-२००८/प्र.क्र.३५८/ वित्त-९, दिनांक २४जून,२००८
४) शासन निर्णय, ग्रा.वि.व ज.सं.विभाग, क्र.संकिर्ण-२०१०/प्र.क्र.१७२/पंरा-७, दिनांक १९ऑक्टोंबर,२०११

**प्रस्तावना :-**

१. पंचायती राज संस्थांमध्ये विविध विकास कामांच्या निविदा सूचनांच्या अनुषंगाने एकच निविद प्राप्त झाल्यास कोणती कार्यवाही करावी, याबाबत जिल्हा परिषद लेखा संहितेमध्ये कोणतीही तरतूद नसल्याने, त्या संदर्भात सविस्तर कार्यपध्दती संदर्भीय दिनांक २४.६.२००८ च्या शासन परिपत्रकान्वये विहीत करण्यात आली. दरम्यान, पंचायती राज संस्थांमध्ये विविध विकासात्मक कामे व विकास कामांसाठी लागणाऱ्या सेवा तथा वस्तुंची खरेदी यासाठी दिनांक १ जानेवारी,२०१२ पासून ई-निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करणे संदर्भीय दिनांक १९.१०.२०११ च्या शासन निर्णयान्वये बंधनकारक करण्यात आले आहे. त्यानुसार ई-गव्हर्नन्स अंतर्गंत ई-निविदा प्रणालीच्या माध्यमातुन प्रसिध्द करण्यात येणाऱ्या निविदा सूचनेस वैश्विक प्रसिध्दी प्राप्त होत असल्याने, प्रथम निविदा सूचनेच्या वेळी एकच निविदा प्राप्त झाल्यास ती स्विकारण्यात यावी किंवा कसे, याबाबत मार्गदर्शन करण्याची जिल्हा परिषदांकडुन विनंती करण्यात येत होती. त्या अनुषंगाने सुधारीत कार्यपध्दती विहीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>:-**

२. पंचायती राज संस्थाअंतर्गत विविध विकास कामे शीघ्र गतीने व्हावेत, या साठी ई-निविदा प्रणालीचा अवलंब करण्यात येत असल्याने, संदर्भीय दिनांक ३०.१२.२००६ चा शासन निर्णय व दिनांक २४.६.२००८ च्या शासन परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आलेल्या सूचना या शासन निर्णयान्वये अधिक्रमित करण्यात येत असुन, त्या ऐवजी खालील कार्यपध्दती विहीत करण्यात येत आहे.

**३. निविदा उघडण्यापुर्वी निविदा प्राधिकाऱ्याने करावयाची कार्यवाही :-**

(१) ई-निविदा प्रणाली अंतर्गत प्रथम निविदा सूचना प्रसिध्दीनंतर निविदा प्रसिध्द करणाऱ्या प्राधिकाऱ्याने निविदा सादर करण्याचा कालावधी संपण्याच्या दिवशी विहीत केलेल्या वेळेच्या साधारणत: एक तासापुर्वी त्यांच्या लॉगीन मधुन बीड सबमीटेड (Bid Submitted) या लींक मधून, एकूण किती निविदा धारकांनी भाग घेतला ते पहावे. त्यामध्ये किमान तीन निविदा धारकांनी भाग घेतला असल्यास, निविदा सूचनेतील अटी/ शर्तीनुसार विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन निविदा उघडण्याची कार्यवाही करावी.

(२) ई-निविदा प्रणाली अंतर्गत तीन पेक्षा कमी निविदा धारकांनी भाग घेतला असल्याचे निदर्शनास आल्यास, संबधित निविदा प्राधिकाऱ्याने निविदा उघडण्याच्या विहित वेळेपुर्वी शुध्दीपत्रक प्रसिध्द करुन ७ दिवसांची मुदतवाढ देण्याची कार्यवाही करावी. (निविदा उघडण्याच्या वेळेनंतर शुध्दीपत्रक व मुदतवाढ देण्याबाबतची कार्यवाही वेबसाईटवर करता येत नाही वा तशी सुविधा वेबसाईटवर देण्यात आलेली नाही, याची सर्व संबधितांनी दक्षता घ्यावी.) (या मुदतवाढीस द्वितीय मागणी असे गृहीत धरण्यात यावे.) अशा प्रकारे मुदतवाढ दिलेल्या निविदेमध्ये पुर्वी ज्या निविदाधारकांनी निविदा भरलेली असेल, त्यांना पुन्हा निविदा भरण्याची आवश्यकता नसते. (मात्र, मूळ निविदेत निविदा प्राधिकाऱ्याने निविदा प्रणालीत दर सुधारण्याची सुविधा दिलेली असल्यास, संबधित निविदाधारकास त्याने भरलेले दर सुधारण्याची मुभा राहते.) या मुदतवाढीचा कालावधी संपण्यापुर्वी पुन्हा संबधित निविदा प्राधिकाऱ्याने त्याच्या लॉगीन मधुन किती निविदा धारकांनी भाग घेतला ते पहावे. या वेळी तीन अथवा त्यापेक्षा जादा निविदाधारकांनी निविदेत भाग घेतलेला असल्याचे निदर्शनास आल्यास निविदा प्राधिकाऱ्यांनी विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन, सदर निविदा स्विकृतीबाबत कार्यवाही करावी.

(३) प्रथम मुदतवाढी नंतरही तीन पेक्षा कमी निविदा धारकांनी निविदेत भाग घेतला असल्याचे निदर्शनास आल्यास, वर नमूद केल्याप्रमाणे पुन्हा वेळीच शुध्दीपत्रक प्रसिध्द करुन ७ दिवसांची पुन्हा मुदतवाढ देण्यात यावी. (या मुदतवाढीस तृतीय मागणी असे गृहीत धरण्यात यावे.) अशा प्रकारे दुसऱ्यांदा मुदतवाढ दिलेल्या निविदेचा निविदा भरण्याचा कालावधी संपल्यानंतर एक जरी निविदा प्राप्त झाली असेल, तर ती उघडण्याची कार्यवाही संबधित निविदा प्राधिकाऱ्याने करावी. सदर उघडण्यात आलेली निविदा, प्रसिध्द करण्यात आलेल्या निविदा संचातील अटी व शर्तीनुसार छाननीअंती पात्र ठरत असल्यास, अशा निविदाधारकाची निविदा स्विकारण्याचा निर्णय पुढील समितीपुढे ठेवावा.

| अधिकाऱ्यांचे पदनाम | समितीमधील पदनाम |
|---|---|
| १. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | अध्यक्ष |
| २. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ३. संबधित निविदेचे विभाग/खातेप्रमुख, जिल्हा परिषद | सदस्य |

वरील निविदा समितीने, निविदेतील अटी शर्ती व/गुणवत्तेवर आधारीत निर्णय घेऊन, सदरहू निविदा स्विकारण्याची कार्यवाही करावी.

**४. निविदा उघडण्यात आल्यानंतर निविदा प्राधिकाऱ्याने करावयाची कार्यवाही :-**

(१) ई-निविदा प्रणाली अंतर्गत प्रथम / व्दितीय मागणीत किमान तीन निविदाधारकांनी निविदा भरल्याचे दिसून आल्यास, निविदा प्राधिकाऱ्याने निविदांचे तांत्रीक लिफाफे उघडावेत. तांत्रिक छाननीमध्ये त्यापैकी केवळ एकच ठेकेदार पात्र ठरल्यास, सदर कामाची फेरनिविदा प्रसिध्द करण्यात यावी. (फेरनिविदेच्या अनुषंगाने पात्र ठेकेदारास सदर कामाची निविदा पुन्हा भरण्याची प्रक्रिया करावी लागेल.) फेरनिविदा प्रसिध्द करताना विभागास निविदा अटी व शर्तीमध्ये आवश्यकता वाटल्यास बदल करता येऊ शकेल. अटी व शर्ती बदलून फेरनिविदा केल्यास त्यास प्रथम मागणी असे गृहीत धरावे. निविदा शर्ती न बदलता फेरनिविदा केल्यास त्या निविदेस फेरनिविदा क्रमांकानुसार व्दितीय / तृतीय मागणी असे गृहीत धरावे.

(३) फेरनिविदा प्रसिध्द केल्यानंतर विहित दिनांकास निविदा उघडण्याची कार्यवाही करणेपुर्वी संबंधित निविदा उघडणा-या प्राधिकाऱ्याने आवश्यकतेनुसार वरील परिच्छेद-३(२) मध्ये नमूद करण्यात आल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(२) ई-निविदा प्रणालीअंतर्गत निविदा सूचनेचा कालावधी हा खाली नमूद केल्या प्रमाणे ठेवण्यात यावा.

| क्र. | कामाच्या निविदेची किंमत | निविदा सूचना क्रमांक व कालावधी | | |
|---|---|---|---|---|
| | | प्रथम | द्वितीय | तृतीय |
| १. | रुपये **५.००** लाखापेक्षा कमी किंमतीची कामे | ०८ दिवस | ०५ दिवस | ०३ दिवस |
| २. | रुपये **५.००** लाख ते रुपये ५०.०० लाखापर्यंतची कामे | १५ दिवस | ०८ दिवस | ०५ दिवस |
| ३. | रुपये **५०.००** लाखापेक्षा अधिक किंमतीची कामे | २५ दिवस | १५ दिवस | १० दिवस |

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०९१९१२३३४३३२२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Wade Chandrakant Haridas

Digitally signed by Wade Chandrakant Haridas
DN: CN = Wade Chandrakant Haridas, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = RDD
Reason: I am approving this document
Location: Mumbai
Date: 2013.09.23 12:16:14 +05'30'

**( चंद्रकांत ह.वडे )**
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
३. मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
४. प्रधान सचिव (सहकार), मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे स्वीय सहायक,
६. सचिव (बांधकाम), मंत्रालय, मुंबई
७. विभागीय आयुक्त (सर्व)
८. उप आयुक्त (विकास),विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)
९. मुख्य अभियंता प्रधानमंत्री ग्रामसडक योजना यांचे स्वीय सहायक
१०. मा.मंत्री (ग्रामविकास विभाग) यांचे खाजगी सचिव,
११. मा.राज्यमंत्री (ग्रामविकास विभाग) यांचे खाजगी सचिव,
१२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१३. सर्व अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१४. सर्व प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
१५. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
१६. सर्व कार्यकारी अभियंता (बांधकाम, लघुपाटबंधारे, पाणी पुरवठा विभाग),जिल्हा परिषद,
१७. सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
१८. ग्रामविकास व जलसंधारण विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने.
१९. निवडनस्ती, कार्यासन पंरा-७